१६७

# महाराष्ट्र शासन

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्र.इडीडी-१०८८/४७४५९/के.नं.३२०/सुधार-२,
दिनांक ९ ऑक्टोबर १९८९.

वाचा:

(१) शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्र.इडीडी-१०६३/न, दिनांक २५ जुलै,१९६२.
(२) शासन निर्णय, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्र.इडीडी-१०६२/५९५१३/न, दिनांक ११ जुलै,१९६३.
(३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०७९/१२३६०/का-१०, दिनांक ७ मे १९८१.
(४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०८६/३५५/सीए-२, दिनांक १५ जानेवारी १९८७.
(५) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०८८/१२१८५/केनं-८२/सुधार-२, दिनांक १० ऑगस्ट १९८९.

**शासन निर्णय**:अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व उपकरणे जसे वैयक्तिक श्रवणयंत्रे, चष्मे, तीन चाकी सायकली, दुचाकी खुर्च्या, कॅलीपर्स, बूट, मानेचे पट्टे, स्पीनल ब्रेसेस, जॅकेट इत्यादी साधने, शासनाकडून पुरविण्याची किंवा त्याकरिता आर्थिक सहाय्य देण्याची योजना वर नमूद केलेल्या दिनांक २५ जुलै १९६२ व दि.११ जुलै १९६३ च्या शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आली असून त्यामध्ये दिनांक ७ मे १९८१, दिनांक १५ जानेवारी १९८७ आणि दिनांक १० ऑगस्ट १९८९ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली. तथापि, सदर योजनेअंतर्गत एस.एस.सी नंतरचे शिक्षण घेणा-या अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व कॅसेट्स पुरविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

(२)त्यास अनुसरुन अपंगांना कृत्रिम अवयव, साधने पुरविण्याचा सदरहू योजनेतर्गत १० वी नंतरचे शिक्षण घेणा-या व दोन्ही डोळयांनी अंध असणा-या विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व कॅसेटस पुरविण्यास शासन संमती देत आहे.

(३)शासन असेही स्पष्ट करीत आहे की, या योजनेअंतर्गत -

(अ)एका विद्यार्थ्याला एकदाच टेपरेकॉर्डर व कॅसेटस् संचल दिला जाईल (१० कॅसेट्स)

(ब) टेपरेकॉर्डर व कॅसेट संच तो विद्यार्थी ज्या शाळेत/महाविद्यालयात शिक्षण घेतो त्या शाळा/ महाविद्यालयामार्फत दिला जाईल.

(क)विद्यार्थ्याने दोन वर्षाचे कालावधीत शिक्षण सोडल्यास त्या वस्तू संबंधित शाळा/ महाविद्यालय त्या विद्यार्थ्यांकडून परत घेऊन संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचेकडे त्वरीत सुपूर्द करील.

(४) याबाबत होणारा खर्च २२३५-सामाजिक सुरक्षा व समाज व कल्याण-०२-समाज कल्याण-१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण (३) अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शिक्षण व कल्याण-(दोन) (ए) शारीरिकदृष्टया अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव इत्यादी देणे-सहाय्यक अनुदान (२२३५०८२१) मागणी क्रमांक एन-६ या अर्थशिर्षाखाली खर्ची

Scanned with OKEN Scanner

९८९

घालण्यात येऊन त्याखाली १९८९-९० या आर्थिक वर्षात केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

(५) हा शासन निर्णय, वित्त विभागाचे सहमतीचे वित्त विभाग अनौ.संदर्भ, क्रमांक सीआर/८०७/व्यय/११ दिनांक २९ सप्टेंबर १९८९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ज.द.बेशरकर
सहाय्यक सचिव

Scanned with OKEN Scanner